**१. कार्यकारी सारांश:-**

**१.१ पार्श्वभूमी.**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित ( महापारेषण ) हा राज्याचा पारेषण उपक्रम असून त्यांच्याकडे विजेच्या निर्मिती स्तोत्रापासून भार केंद्रापर्यंत पारेषण (वहन) करण्याची तसेच राज्य पारेषण प्रणालीचे नियोजन, विकास, संचालन आणि देखभाल ही कामे करण्याची समर्पित जबाबदारी आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( मविनिआ) यांच्या बहुवर्षीय वीजदर विनियम, २०१५ (यानंतर यांचा उल्लेख म.वि.नि.आ. बहुवर्षीय वीज दर विनियम,२०१५, असा केला आहे). यानुसार आर्थिक वर्ष २०१९-२० चे समायोजन करणे आणि आर्थिक वर्ष २०२०-२१, आर्थिक वर्ष २०२१-२२ यांचे समायोजन करणे आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता एकूण महसूल आवश्यकते चे हंगामी समायोजन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग नुसार बहुवर्षीय विनियम २०१९ (यानंतर याचा उल्लेख मविनिआ बहुवर्षीय विनियम २०१९, असा केला आहे) यानुसार करवयाचे आहे पुढे याच विनियम २०१९ व्दारे सुधारित अंदाजित एकूण महसूल आवश्यकता आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता शिल्लक नियंत्रण कालावधीच्या अनुषंगाने करावयाचे आहे. नामंजूर भांडवलीकरणाच्या दाव्याच्या प्रभावासह आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१८-१९ या कालावधीसाठी आणि ATE च्या निर्णयाच्या प्रभावसह विलंबित देयक शुल्क इतर घटक ( अपिल क्र. २४२/२०१५ ) यांचाही या याचिकेत समावेश करण्यात आला आहे.

महापारेषणने वित्तीय वर्ष २०११-१२ च्या एकूण महसूल आवशक्यतांचे समायोजन करणेए वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या वार्षिक कार्यपालन आढावा ( Annal Performance Review (APR ) आणि वित्तीय वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ या कालावधीसाठी बहुवर्षीय वीजदर (MYT) निश्चित करणे यासाठी याचिका केली होती. मा. आयोगाचे सदर प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ चे आदेश (दि. १३ फेब्रुवारी २०१४ ला दिला. या आदेशामुळे आणि मा. आयोगाने दिलेल्या आदेशात काही दोष आढळल्याने महापारेषणने मा. आयोग यांच्याकडे शपथपत्रानुसार आढावा घेण्यासाठी पुन:विलोकन याचिका सादर केली (त्यामध्ये या तपशीलवार वीजदर आदेशातील ज्या विशिष्ट मुद्द्यांवर आढावा घेण्याची विनंती करण्यात येत आहे त्याची विर्निदेशीत कारणांची सूची दिली आहे). महापारेषणने केलेल्या याचिका वैधता निश्चित केल्यानंतर मा. आयोगाने प्रकरण क्र. ७९ वर्ष २०१४ अंतर्गत पुन:विलोकन वीजदर आदेश दि. २४ जून २०१४ रोजी दिला.

त्यासोबतच मा. आयोगाने स्वाधिकाराने (suo moto) प्रकरण क्र. १२३ वर्ष २०१४ यात आंतरराज्य पारेषण वीजदर आदेश दि. १४ ऑगस्ट २०१४ देऊन महापारेषण करिता वित्तीय वर्ष २०१४-१५ आणि वित्तीय वर्ष २०१५-१६ च्या वीजदरात सुधारणा केली.

मा. आयोगाकडेए महापारेषणने वित्तीय वर्ष २०१२-१३ चे एकत्रित महसूल आवश्यकता (ARR) यांचे समायोजन करणेए वित्तीय वर्ष २०१३-१४ साठी हंगामी समायोजन करणे आणि वित्तीय वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ च्या सुधारित अंदाजांना मंजूरी, यासाठी याचिका सादर केली होती. मा. आयोगाने या विषयी प्रकरण क्र. २०७ वर्ष २०१४ यामध्ये दि. २६ जून २०१५ रोजी आदेश दिला. महापारेषणने या आदेशासंबंधी मा. आयोगाकडे पुन:विलोकन याचिका (प्रकरण क्र. १०५ वर्ष २०१५) सादर केली. तसेच विजेसंबंधीचे मा. अपेलेट ट्रिब्यूनल

विजेसंबंधी दि. ७ ऑगस्ट २०१५ रोजी (प्रकारण केआर. २४२ वर्ष २०१५) वित्तीय वर्ष २०१२-१३ आणि वित्तीय वर्ष २०१३-१४ यांचे अंतिम समायोजन केल्यानंतर तसेच वित्तीय वर्ष २०१४-१५ चे हंगामी समायोजन आणि वित्तीय वर्ष २०१५-१६ चे सुधारित अंदाज केल्यानंतर त्यामुळे निर्माण होणारे महसुलतील फरक (resultant revenue gaps)योग्य प्रकारे पुन्हा नमूद केले जाते. मा. आयोगाने आढाव्याच्या संबंधी विनंती अर्जावर म्हणून प्रकरण केआर. १०५ यात दि. २२ डिसेंबर २०१५ रोजी आदेश दिला.

मा. अपेलेट ट्रिब्यूनल विजेसंबंधी दि. २९ ऑगस्ट २०२२ रोजी मा. आयोगाला निर्देश (तोंडी) दिले की सदर प्रकरण नव्याने लवकरात लवकर विचारात घ्यावे आणि पुढे असे नमूद केले की राज्य आयोगाने या संदर्भात पूर्वी घेतलेल्या मताचा प्रभाव न पडता या प्रकरणाकडे पाहावे. त्यानुसार महापारेषण ने तात्पुरत्या स्वरुपात अशा निर्णयाच्या परिणामाची तात्पुरती मोजदाद केली आहे आणि मा. आयोगाच्या निर्देशानुसार दाव्याचा विचार करण्याची मा. आयोगाला विनंती केली आहे.

महापारेषण कंपनीने म.वि.नि.आ. (बहुवर्षीय) नियमने २०१५ वितरीत केली असून ती राजपत्रात दि. ८ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झाली. महापारेषण कंपनीने म.वि.नि.आ. (बहुवर्षीय) नियमने २०११ यावर आधारित वित्तीय वर्ष २०१४-१५ चे समायोजन करणे, वित्तीय वर्ष २०१५-१६ चे हंगामी समायोजन करणे आणि म.वि.नि.आ. (बहुवर्षीय) नियमने २०१५ यावर आधारित वित्तीय वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीच्या एकत्रित महसूल आवश्यकता यांचेकरिता एक विनंती अर्ज दि. १० फेब्रुवारी २०१६ रोजी सादर केला. त्या विनंती अर्जाबाबत तांत्रिक वैधता सत्रे (TVS) झाल्यानंतर महापारेषण कंपनीने सुधारित याचिका १३ एप्रिल २०१६ रोजी सादर केली. मा. आयोगाने या विषयी प्रकरण कर. ३१ वर्ष २०१६ यामध्ये दि. ७ जुलै २०१६ रोजी आदेश दिला.

मा. आयोगाने या विषयी प्रकरण क्र. ३१ वर्ष २०१६ या आदेशासंबंधी म. आयोगाकडे पुनर्विलोकन याचिका प्रकरण क्र २८१ वर्ष २०१८ रोजी सादर केली. तसेच वीज संबंधीचे मा. अपलेट न्यायाधिकरण यांचेकडे विविध मुद्द्यांवर दि. ११ ऑगस्ट २०१६ रोजी अपील केले (प्रकरण क्र. ६७वर्ष २०१७). महापारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ यांचे अंतिम समायोजन, वित्तीय वर्ष २०१७-१८ चे हंगामी समायोजन, वित्तीय वर्ष २०१८-१९ व वित्तीय वर्ष २०१९-२० यांच्या एकत्रित महसूल आवश्यकतांची पुनर्मोजणी, म.वि.नि.आ. (बहुवर्षीय) नियमने २०१५ यातील तरतुदींसाठी दि. ३० नोव्हेंबर २०१७ रोजी याचिका सादर केली. याचबरोबर दि. ११ जून २०१८ रोजी याच याचिकेची सुधारित याचिका दाखल केली. मा. आयोगाने या विषयी प्रकरण क्र. १६८ वर्ष २०१७ यामध्ये दि. १२ सप्टेंबर २०१८ रोजी आदेश दिला.

महापारेषणने मा. आयोगाकडे प्रकरण क्र. ३१३ वर्ष २०१८ द्वारे (प्रकरण क्र. १६८ वर्ष २०१७) या संदर्भात आणि वीजेसंबंधीचे मा. अपेलेट न्यायाधिकरण यांचेकडे मा. आयोगाच्या आदेशाच्या संदर्भात आणि या आदेशातील विविध मुद्द्यांवर दि. ४ फेब्रुवारी २०१९ रोजी (प्रकरण क्र. ३७९ वर्ष २०१९) आवाहन करून पुनर्विलोकन याचिका दाखल केली.

दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी मा. आयोगाने महापारेषणला बहुवर्षीय नियमने २०१९ अन्वये निर्देश दिले की चतुर्थ नियंत्रण कालावधी, वित्तीय वर्ष २०२०-२१ पासून वित्तीय वर्ष २०२४-२५ पर्यंत लागू राहील असे सूचित केले.

महापारेषणने एकूण महसूल आवश्यकताचे समायोजनासाठी वित्तीय वर्ष २०१७-१८ व वित्तीय वर्ष २०१८-१९ आणि वित्तीय वर्ष २०१९-२० चे हंगामी एकूण महसूल आवश्यकताचे समायोजन, बहुवर्षीय नियमने २०१५

अंतर्गत आणि एकूण महसूल आवश्यकताचे चवथ्या बहुवर्षीय वीजदर नियंत्रित कालावधी वित्तीय वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५, बहुवर्षीय नियमने २०१९ अंतर्गत, वित्तीय वर्ष २०१०-११ ते वित्तीय वर्ष २०१६-१७ साठी नामंजूर भांडवलीकरणाच्या मागील कालावधीच्या प्रभावासह, बहुवर्षीय वीजदर याचिका दि. ९ डिसेंबर २०१९ रोजी दाखल केली. महापारेषणने दाखल केलेल्या MTR याचिकेच्या संदर्भात मा. आयोगाने प्रकरण क्र. ३०२ वर्ष २०१९ दि. ३० मार्च २०२० च्या संदर्भात निर्देश दिले.

वीजेसंबंधीचे मा. अपेलेट न्यायाधिकरण यांचेकडे महापारेषणने प्रकरण क्र. ३०२ वर्ष २०१९ च्या संदर्भात दि. ४ डिसेंबर २०२० रोजी आवाहन दाखल केले आणि हे आवाहन क्र. १०७ वर्ष २०२१ असे नोंदणीकृत झाले.

१.२ विद्यमान याचिका.

महापारेषण, बहुवर्षीय वीजदर नियमने २०१५ तील तरतूद विचारात घेता वित्तीय वर्ष २०१९-२० च्या समायोजनासाठी आणि बहुवर्षीय वीजदर नियमने २०१९, वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या समायोजनासाठी, वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या हंगामी समायोजनासाठी आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या सुधारित एकूण महसूल आवश्यकतासाठी ही मध्यावधी पुनरावलोकन २०२२ याचिका दाखल करीत आहे.

महापारेषण ने वित्तीय वर्ष २०१९-२०, वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ यांचे अंतिम समायोजन करण्यासाठी विद्यमान याचिका दाखल केली आहे.

बहुवर्षीय नियमने २०१५ मधील लेखापरीक्षित खाती आणि नियमावलीत नमूद केलेली तत्वे, ज्याद्वारे वित्तीय वर्ष २०१९-२० चे समायोजन आणि बहुवर्षीय नियमने २०१९ द्वारे वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ चे समायोजन पार पाडण्यासाठी आधार तयार केला आहे, महापारेषणने मागील वर्षातील नामंजूर भांडवलीकरणासाठी आणि विद्यमान याचिकेमध्ये ATE निकाल (२४२/२०१५) चा प्रभाव, असा देखील दावा केला आहे.

या याचिकेमध्ये महापारेषण ने वित्तीय वर्ष २०२२-२३ चे हंगामी समायोजन करण्याचे मांडले आहे. बहुवर्षीय नियमने २०१९ मध्ये नमूद केलेली तात्पुरती हिशोब आणि तत्त्वे हंगामी समायोजन पार पाडण्यासाठी आधार मानली जातात

महापारेषण ने सुधारित एकूण महसूल आवश्यकता ची बहुवर्षीय नियमने २०१९ च्या अनुषंगाने वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या अंदाजपत्राची आणि वित्तीय वर्ष २०१९-२०, वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ चे समायोजन करण्याचे परिणाम अंतर्भूत केले आणि वित्तीय वर्ष २०२२-२३ चे हंगामी समायोजन करण्याचे आणि इतर प्रभाव आणि मागील अंतर आणि वहन खर्च इत्यादि मोजदाद केली आहे.

१.२.१ मागील वर्षातील नामंजूर भांडवलीकरणाचा मालमत्तेवरील प्रभाव

महापारेषण ने त्यांच्या मागील बहुवर्षीय वीजदर याचिका प्रकरण क्र. ३०२ वर्ष २०१९ मध्ये मागील वर्षातील नामंजूर भांडवलीकरणाचा मालमत्तेवरील प्रभाव दिलेला आहे आणि मा. आयोगाने मंजूर केलेली एकूण रक्कम रुपये ११२.२० कोटी (महापारेषणची मागणी रुपये ३२३.७९ कोटी). महापारेषण ने नामंजूर भांडवलीकरणासाठी न वापरलेले bays आणि इतर भांडवली खर्चाच्या योजना ज्यांचा वापर झाला नाही ही मूळ कारणे आहेत असे सादर केले आहे.

महापारेषण ने बहुवर्षीय वीजदर आदेश आणि वर्तमान बहुवर्षीय वीजदर याचिका यामधील कालावधी दरम्यान काही योजना अमलात आणलेल्या आहेत आणि त्यानुसार सदर भांडवलीकरणाचा दावा रुपये १५८.४६ कोटी, एकूण महसूल आवश्यकताचा प्रभावासोबत पुढील संबंधित वर्षांसाठी केला आहे, असे सादर केले आहे.

तक्ता १ मागील कालावधीसाठी नामंजूर भांडवलीकरणाचा दावा

रुपये कोटींमध्ये

| तपशील | वि. वर्ष २०१०-११ | वि. वर्ष २०११-१२ | वि. वर्ष २०१२-१३ | वि. वर्ष २०१३-१४ | वि. वर्ष २०१४-१५ | वि. वर्ष २०१५-१६ | वि. वर्ष २०१६-१७ | वि. वर्ष २०१७-१८ | वि. वर्ष २०१८-१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भांडवलीकरण दावा | ४०.४३ | ८.१७ | ९.४६ | ३.३० | १२.५३ | ९.८३ | ०.६७ | २२.४७ | ७९.३४ | १८६.१९ |

तक्ता 2 मागील कालावधीसाठी नामंजूर भांडवलीकरणाचा प्रभाव

रुपये कोटींमध्ये

| भांडवलीकरण दावा वि. वर्ष | घसारा | कर्जावरील व्याज | भाग भांडवलावरील परतावा | एकूण प्रोत्साहना आधी | प्रोत्साहन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| वि. वर्ष २०१०-११ | ०.५७ | १.५७ | ०.५७ | २.७० | ०.०५ | २.७५ |
| वि. वर्ष २०११-१२ | १.४० | ३.८४ | १.२५ | ६.४८ | ०.११ | ६.६० |
| वि. वर्ष २०१२-१३ | १.४१ | ४.२३ | १.४९ | ७.१३ | ०.१३ | ७.२७ |
| वि. वर्ष २०१३-१४ | २.३१ | ४.९३ | १.८५ | ९.१० | ०.१८ | ९.२८ |
| वि. वर्ष २०१४-१५ | २.६१ | ५.४८ | २.१० | १०.१९ | ०.२० | १०.३९ |
| वि. वर्ष २०१५-१६ | २.५८ | ६.१० | २.४४ | ११.१३ | ०.२१ | ११.३४ |
| वि. वर्ष २०१६-१७ | ३.२७ | ६.१९ | १.२६ | १०.७२ | ०.०८ | १०.८० |
| वि. वर्ष २०१७-१८ | ३.७४ | ६.४० | १.४४ | ११.५८ | ०.०७ | ११.६५ |
| वि. वर्ष २०१८-१९ | ५.६९ | ९.८७ | ४.७० | २०.२६ | ०.१० | २०.३५ |
| एकूण | २३.५७ | ४८.६१ | १७.१० | ८९.२८ | १.१४ | ९०.४२ |

वर नमूद केलेल्यावर संबंधित वर्षांचा व्याजदर लक्षात घेऊन वहन खर्चाची देखील मोजणी केलेली आहे आणि ती एकूण रक्कम रुपये ६८.०४ कोटी आहे. दावा केलेल्या नामंजूर भांडवलीकरणाचा वहन खर्चासह एकूण प्रभाव रुपये १८६.१९ कोटी.

१.२.२ आवाहन क्र. २४२ वर्ष २०१५ चा प्रभाव

महापारेषण ने वित्तीय वर्ष २०१२-१३ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ साठी बहूवर्षीय वीजदर द्‌वितीय नियंत्रण कालावधीसाठी मध्यावधी कामगिरी आढावा प्रकरण क्र. २०७/२१४) म्हणून नोंदवलेल्या याचिकेवर दिनांक २६ जून २०१५ च्या मा. आयोगाच्या आदेशाविरूद्ध अपील करण्यास प्राधान्य दिले होते. सदर आवाहन हे आवाहन क्र. २४२ वर्ष २०१५ असे नोंदणी केले आणि (तोंडी) निकालपत्र दि. २९ ऑगस्ट २०२२ रोजी घोषित केले. ह्या (तोंडी) निकालपत्रात वीजेसंबंधीच्या मा. ॲपलेट न्यायाधिकरण यांनी खालील नमूद मुद्दे नव्याने जवळील तारखेला विचारात घेण्यासंदर्भात मा. आयोगाला निर्देश दिले.

• वित्तीय वर्ष २०१३-१४ मधील वेतनश्रेणी सुधार हा नियंत्रित खर्च आहे असे कारण देऊन कार्य आणि देखभाल खर्चात कार्यक्षमता वाढ नाकारण्यात आली (विवाद असलेली रक्कम रुपये १४२.०३ कोटी).
• वित्तीय वर्ष २०१२-१३ आणि वित्तीय वर्ष २०१३-१४ मधील एकत्रित महसूल आवश्यकताच्या जास्त उपलब्धतेसाठी प्रोत्साहन मंजूर करताना एक भाग म्हणून आयकर विचारात घेतलेला नाही ( विवाद असलेली रक्कम रुपये १६.९६ कोटी).
• वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये एकत्रित महसूल आवश्यकतासाठी विलंब भरणा शुल्काची नोंद घेणे ( नामंजूर केलेली रक्कम रुपये ८५४.९९ कोटी).

महापारेषणने (विद्‌यमान एकत्रित महसूल आवश्यकता दाव्यात) रुपये १,७६०.५४ कोटीची रक्कम मोजली आहे आणि या याचिकेतील अंतिम रक्कम वहन खर्चासहीत माननीय आयोगाने मंजूर केल्यानुसार असेल आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ करीता सुधारित प्रसारण शुल्क / एकत्रित महसूल आवश्यकता अंतर्गत मान्यता देण्यात येईल. महापारेषणने दाव्याची रक्कम वहन खर्चासहीत वित्तीय वर्ष २०२२-२३ पर्यंत मोजली आहे आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या सुरुवातीच्या महसुलातील अंतरामध्ये एकूण रक्कम जोडली आहे. लाभार्थ्यांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी ATE प्रभावासह एकूण सुरुवातीच्या महसुलातील अंतर २ वर्षांमध्ये वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ विभागण्यात आले आहे. महापारेषणने ने बहुवर्षीय वीजदर आदेशामधील दृष्टिकोनानुसार वहन खर्च दोन वर्षांमध्ये वसुलीसाठी समान विभागण्यासाठी दावा केला आहे.

१.२.३ विशेष राखीव रकमेचा वापर/उपयोग करण्यासाठी निर्देश मागणे.

महापारेषण, मा. आयोगाने वेळोवेळी शिफारस केल्यानुसार, विनियम २००५ नियमावली १९ ;वीजदराच्या अटी व शर्ती) च्या अंतर्गत विशेष राखीव निधी ठेवीत आहे, जे नियंत्रण करण्यायोग्य घटकांमुळे, नफा आणि तोटा वाटून घेण्याच्या यंत्रणेशी संबंधित आहे आणि त्यांनी वित्तीय वर्ष २०१४-१५ पर्यंत योगदान दिले आहे.

महापारेषणच्या दि. ३१ मार्च २०२२ अखेरच्या ताळेबंद पत्रकात राखीव निधी रक्कम रुपये १३९.३९ एवढी नोंदविण्यात आली आहे आणि मा. आयोगाच्या बहुवर्षीय वीजदर नियमन २०११, २०१५ आणि २०१९ यामध्ये राखीव निधीच्या पर्यायी वापर आणि उपयोग बाबतीत काहीही नमूद करण्यात आलेले नाही. म्हणून महापारेषण, मा. आयोगाकडे राखीव निधी रक्कम रुपये १३९.३९ चा पर्यायी वापर आणि उपयोग बाबतीत निर्देश मिळावेत याकरिता ही बहुवर्षीय वीजदर याचिका दाखल करीत आहे.

महापारेषण सादर करते की विशेष आरक्षित रकमेच्या वापर आणि उपयोगासाठी वैकल्पिकरित्या माननीय आयोग खालील प्रस्तावावर विचार करू शकेल.

महापारेषण ही रक्कम माननीय आयोग च्या मान्यतेच्या अधीन राहून कोणत्याही नाविन्यपूर्ण कल्पना/तंत्रज्ञानासाठी/नैसर्गिक आपत्तींमुळे उद्भवलेल्या कोणत्याही आपत्कालीन कामांसाठी वापरेल.

१.२.४ राखीव सुटे भाग यांचा मालसाठा ऐवजी मालमत्ता, कारखाना आणि यंत्रसामुग्री असा उपयोग करण्यासाठी संबंधित धोरणाची सुधारणा.

महापारेषणने, असे सादर केले की, उपकरणे निकामी झाल्यामुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी, त्यांनी एक धोरण तयार केले आहे, ज्यामध्ये काही उपकरणे उपकेंद्रांच्या स्तरावर महत्वाचे सुटे भाग म्हणून ठेवली जातील, जी पूर्वी मालसाठा म्हणून मानली गेली होती.

नंतर, IND AS 16 धोरणानुसार मालमत्ता, कारखाना आणि यंत्रसामुग्री, मालसाठा, दुरुस्ती आणि निगाए विलंबित कर इ.शी संबंधित सर्व वस्तू मालमत्ता, कारखाना आणि यंत्रसामुग्री (PPE) मानल्या जाणार आहेत आणि लेखापरीक्षण अहवालात वैधानिक लेखापरीक्षकाने हे पात्र ठरविले आहे.

मा. आयोगाने, प्र. क्र. ३०२ वर्ष २०१९ मध्ये भांडवलीकरणाचा दावा रु. ९८.९९ कोटी (Non DPR म्हणून ) मालमत्ता वापर केला नाही आणि फक्त सुटे भाग वापरले याकरिता नामंजूर केला आहे.

महापारेषणने, असे सादर केले की, जर सदर खर्च रक्कम मा. आयोगाकडून मंजूर झाले नाही कारण मालमत्ता वापर केला नाही, तर महापारेषणला आर्थिक नुकसान सहन करावे लागेल.

त्यामुळे, महापारेषण गंभीर सुटे भाग हे दुरुस्ती आणि निगा खर्चा अंतर्गत खरेदी करेल आणि पूर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये भांडवलीकरण केलेली राखीव उपकरणे त्याच्या संबंधित घसारासोबत आरक्षित करेल.

महापारेषण असे सादर करू इच्छिते की, वरील दुरुस्ती आणि निगा खर्चाच्या पुनर्स्थापनेच्या परिणामी स्थूल स्थिर मालमत्तेमध्ये समायोजनाची परिस्थिती आणि आर्थिक वर्ष २०२१- २०२२मध्ये दुरुस्ती आणि निगा खर्च खाली सारणीबद्ध केला आहे.

तक्ता ३. लेखापरीक्षित अहवाल आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये केलेले समायोजन.

आर्थिक वर्ष २०२१-२२ ( धोरणात बदल) मध्ये स्थूल स्थिर मालमत्तेमध्ये केलेले समायोजन

रुपये कोटींमध्ये

| आर्थिक वर्ष | स्थूल स्थिर मालमत्तेमध्ये समायोजन / घट | दुरुस्ती आणि निगा खर्च मध्ये समायोजन / घट | मालसाठया मध्ये शिल्लक |
|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१४-१५ | १७.०९ | - | १७.०९ |
| आर्थिक वर्ष २०१५-१६ | ११.५३ | ७.२३ | ४.३० |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ | २७.१३ | २१.४१ | ५.७२ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ | २९.०९ | २९.१३ | (०.०४) |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ | ९८.९९ | १०२.९६ | (३.९७) |
| आर्थिक वर्ष २०१९-२० | ६१.३७ | ५५.५८ | ५.७९ |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ | १९९.१९ | १९९.१७ | ०.०१ |
| एकूण | ४४४.४० | ४१५.४९ | २८.९१ |

वर नमूद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये धोरणात बदलामुळे आणि आर्थिक वर्ष २०१८-१९, आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये दुरुस्ती आणि निगा खर्चाच्या दाव्याची गरज, महापारेषणने आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील दुरुस्ती आणि निगा खर्चाकरिता स्वतंत्रपणे (बहुवर्षीय वीजदर आदेश मध्ये केलेल्या समायोजना अंतर्गत ) दावा दाखल केलेला आहे. दुरुस्ती आणि निगा खर्च रु. ५५.५८ कोटी आणि रु. १९९.१७ हे अनुक्रमे आर्थिक वर्ष २०१९-२० आणि आर्थिक वर्ष २०२०-२१ यातील समायोजन परिछेदात चर्चा केल्याप्रमाणे दावा दाखल केलेला आहे. खालील तक्ता प्र. क्र. ३०२/२०१९ मध्ये मंजूर केलेल्या समान प्रमाणिक रकमेचा विचार करून आणि सध्याच्या याचिकेत दावा करण्यात आलेल्या फरकाचा विचार करून आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी दुरुस्ती आणि निगा खर्चाचे निव्वळ हक्क दाखविले आहे

तक्ता ४. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी दुरुस्ती आणि निगा खर्चाचा दावा (निव्वळ हक्क)

आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी दुरुस्ती आणि निगा खर्चाचा दावा

रुपये कोटींमध्ये

| तपशील | बहुवर्षीय वीजदर आदेश | प्रमाणिक | वास्तविक | कार्यक्षमता लाभ/नुकसान | कार्यक्षमता लाभ/नुकसान TSU सोबत सामायिक | नफा वाटून घेतल्यावर निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| देखभाल व दुरूस्ती खर्च (३०२/२०१९ मध्ये मंजूर) | १४३९.०० | २०४९.३८ | १४२९.६३ | ६१९.७५ | ४१३.१७ | १६३६.२१ |
| अधिक –IND-AS 16 प्रमाणे खाते नोंद केलेल्यात | | | १०२.९६ | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बदल | | | | | | |
| सुधारित देखभाल व दुरूस्ती खर्च | १४३९.०० | २०४९.३८ | १५३२.५९ | ५१६.७९ | ३४४.५३ | १७०४.८५ |
| आता करीत असलेला विचलन दावा | | | | | | ६८.६४ |

महापारेषणने मा. आयोगाला विनंती केली आहे की, या याचिकेत नमूद केल्यानुसार दुरुस्ती व निगा खर्च रु. ६८.६४ कोटीच्या खर्चा सह निव्वळ खर्चास मंजूरी द्यावी.

१.२.५ आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एकूण महसूल आवशक्यता यांचे समायोजन करणे.

आर्थिक वर्ष २०१९-२० चे लेखा परीक्षित अहवाल उपलब्ध असल्याने महापारेषण ही याचिका एकूण महसूल आवशक्यता यांचे समायोजन करण्यासाठी दाखल करीत आहे. या याचिकेमध्ये एकूण महसूल आवशक्यता मा. आयोगाने प्र. क्र. ३०२ वर्ष २०१९ मध्ये मंजुर केलेल्या रकमेपेक्षा जास्त आहे कारण, मुख्यतः कार्य आणि देखभाल व दुरूस्ती खर्चातील नफा आणि भाग भांडवलावरील भागावरील परतावा दर फरकामुळे (मा. आयोग ७.५०%, व महापारेषण १५.५०%).

तक्ता ५. वित्तीय वर्ष २०१९-२० मधील समायोजन सारांश.

रुपये कोटींमध्ये

| तपशील | बहुवर्षीय वीजदर आदेश | प्रमाणिक | वित्तीय वर्ष २०१९-२० लेखा परिक्षित | नफा/(तोटा) शेअर केल्यानंतर निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|
| देखभाल व दुरूस्ती खर्च | १५७२.९६ | २५६७.२६ | १९१६.९६ | २१५०.१९ |
| घसारा खर्च | १०५१.३५ | - | १०७६.०४ | १०७६.०४ |
| दिर्घ मुदत कर्जावरील व्याज | ७७८.७७ | - | ७८६.८४ | ७८६.८४ |
| इतर व्याज आणि आर्थिक शुल्क | १.०० | - | ०.५५ | ०.५५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १०.०० | ८९.४६ | १४.७९ | ३९.६८ |
| आयकर | ९६.७९ | - | ११४.९५ | ११४.९५ |
| **आकस्मिक राखीव योगदान** | ६६.१४ | - | ६६.६१ | ६६.६१ |
| एकत्रित महसूल खर्च | ३५७७.०० | - | ३९७६.७४ | ४२३४.८५ |
| अधिक – भाग भांडवलावरील परतावा | ४७४.६८ | - | ९८८.८१ | ९८८.८१ |
| एकत्रित महसूल आवशक्यता | ४०५१.६८ | - | ४९६५.५५ | ५२२३.६६ |
| **वजा : दरबाहय उत्पन्न** | २६२.६७ | - | ३७१.४३ | ३७१.४३ |
| **वजाः व्हीलिंग शुल्क उत्पन्न** | ११०.०९ | - | ११२.०८ | ११२.०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वजाः उत्पन्न **POC** शुल्क **InSTS** द्वारे | ५.९९ | - | - | - |
| प्रोत्साहन आणि प्रभावासह पारेषण दरामधून निव्वळ एकत्रित महसूल आवशक्यता | ३६७२.९२ | - | ४४८२.०४ | ४७४०.१५ |
| अधिक :मंजूर न केलेल्या **Non-DPR** भांडवलीकरणाचा परिणाम आणि **IND AS – १६** जारी करणे, आर्थिक वर्ष २०१८–१९ या मागील वर्षाचा कमी केलेला दुरुस्ती आणि देखभाल खर्चाचा दावा | - | - | - | ६८.६४ |
| अधिक – उच्च पारेषण प्रणालीवर प्रोत्साहन | - | - | - | ३४.९२ |
| प्रोत्साहन आणि प्रभावासह पारेषण दरामधून निव्वळ एकत्रित महसूल आवशक्यता | ३६७२.९२ | - | ४४८२.०४ | ४८४३.७१ |
| पारेषण दरामधून उत्पन्न आणि अतिरिक्त पारेषण नियमन शुल्क | ३५२५.४७ | - | - | ३५७१.९६ |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) | १४७.४५ | - | - | १२७१.७५ |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) मागील वर्षापर्यंत | २३६.६३ | - | - | २३६.६३ |
| एकत्रित उत्पन्न फरक / (अतिरिक्त) चालू वर्षांपर्यंत | ३८४.०९ | - | - | १५०८.३८ |

१.२.६ वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या एकूण महसूल आवश्यकतांचे समायोजन.

वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या एकूण महसूल आवश्यकतांचे समायोजन करण्यासाठी महापारेषण ही याचिका दाखल करत आहे कारण या दोनही वर्षांचे लेखपरीक्षित अहवाल उपलब्ध झालेले आहेत. या याचिकेमध्ये एकूण महसूल आवशक्यता मा. आयोगाने प्र. क्र. ३०२ वर्ष २०१९ मध्ये मंजुर केलेल्या रकमेपेक्षा जास्त आहे कारण, मुख्यतः देखभाल व दुरूस्ती खर्चातील नफा आणि भाग भांडवलावरील परतावा आयकर प्रभावी दरातील फरकामुळे जमा झाला आहे - दर ३५% (वर्ष २०२१-२२ साठी प्रभावी कर दर २४.७२ आहे).

तक्ता ६. वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या समायोजनाचा सारांश.

रुपये कोटींमध्ये

| तपशील | वित्तीय वर्ष २०२०-२१ | | | |
|---|---|---|---|---|
| | बहुवर्षीय वीजदर | प्रमाणिक | वित्तीय वर्ष २०२०-२१ | नफा/(तोटा) शेअर केल्यानंतर |

| | आदेश | | लेखा परिक्षित | निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|
| देखभाल व दुरूस्ती खर्च | १७१९.७४ | २०६८.४५ | १७६८.२५ | १८८६.८१ |
| घसारा खर्च | १०९४.१० | - | ९७६.५३ | ९७६.५३ |
| दिर्घ मुदत कर्जावरील व्याज | ७४१.७० | - | ७५७.१३ | ७५७.१३ |
| इतर व्याज आणि आर्थिक शुल्क | १.०० | - | ७.७८ | ७.७८ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ९५.२० | ८७.७२ | ५.५२ | ३२.९२ |
| आयकर | - | - | - | - |
| **आकस्मिक राखीव योगदान** | ६८.४० | - | ६८.९७ | ६८.९७ |
| एकत्रित महसूल खर्च | ३७२०.१४ | | ३५८४.१८ | ३७३०.१४ |
| अधिक – भाग भांडवलावर परतावा | १११११.६७ | | १५३०.२६ | १५३०.२६ |
| एकत्रित महसूल आवशक्यता | ४८३१.८१ | - | ५११४.४४ | ५२६०.४० |
| **वजा : दरबाहय उत्पन्न** | २१०.४७ | - | २४०.८२ | २४०.८२ |
| **वजाः व्हीलिंग शुल्क** व इतर उत्पन्न | ११५.६० | - | १३३.१२ | १३३.१२ |
| **वजाः उत्पन्न POC शुल्क InSTS द्वारे** | ५.९९ | - | - | - |
| **पारेषण व्यवसायातून एकत्रित कमाईची आवश्यकता** | ४४९९.७५ | - | ४७४०.५० | ४८८६.४६ |
| अधिक – मागील उत्पन्न /(फरक) अतिरिक्त वरील वहन खर्च (धारण खर्च) | ५२.३४ | - | - | ५२.३४ |
| अधिक – वहन खर्च (धारण खर्च) फरक विभाजित करण्यासाठी | १६.६७ | - | - | १६.६७ |
| अधिक – मागील उत्पन्नातील फरक / (अतिरिक्त) नियंत्रीत कालावधीत विभाजित करण्यासाठी | ३४.९५ | - | - | ३४.९५ |
| प्रोत्साहन आणि प्रभावसह पारेषण दरामधून निव्वळ एकत्रित महसूल आवशक्यता | ४६०३.७१ | - | ४७४०.५० | ४९९०.४२ |
| पारेषण दरामधून उत्पन्न आणि अतिरिक्त पारेषण नियमन शुल्क | ४६०३.७१ | - | ४६०३.६२ | ४६०३.६२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) | - | - | - | ३८६.८० |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) मागील वर्षापर्यंत | - | - | - | १५०८.३८ |
| एकत्रित उत्पन्न फरक / (अतिरिक्त) चालू वर्षांपर्यंत | - | - | - | १८९५.१८ |

रुपये कोटींमध्ये

| तपशील | आर्थिक वर्ष २०२१-२२ | | | |
|---|---|---|---|---|
| | बहुवर्षीय वीजदर आदेश | प्रमाणिक | आर्थिक वर्ष २०२१-२२ लेखा परिक्षित | महापारेषणचा नफा वाटून घेतल्यावर निव्वळ हक्क |
| देखभाल व दुरूस्ती खर्च | १६५४.४६ | २१९६.२६ | १९४५.११ | २०४९.८९ |
| घसारा खर्च | ११३४.४६ | - | ११३७.१४ | ११३७.१४ |
| दिर्घ मुदत कर्जावरील व्याज | ६९६.८४ | - | ६४०.३४ | ६४०.३४ |
| इतर व्याज आणि आर्थिक शुल्क | १.०० | - | २१.२९ | २१.२९ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ९६.६१ | ८९.४९ | ०.०० | २९.८३ |
| आयकर | - | - | | - |
| **आकस्मिक राखीव योगदान** | ७०.७९ | - | ७०.९७ | ७०.९७ |
| एकत्रित महसूल खर्च | ३६५४.१६ | - | ३८१४.८६ | ३९४९.४७ |
| अधिक – भाग भांडवलावर परतावा | ११४८.६७ | - | १३७३.५६ | १३७३.५६ |
| एकत्रित महसूल आवशक्यता | ४८०२.८३ | - | ५१८८.४३ | ५३२३.०३ |
| **वजा : दरबाहय उत्पन्न** | २१४.६८ | - | ३०६.३४ | ३०६.३४ |
| **वजाः व्हीलिंग शुल्क** व इतर **उत्पन्न** | १२१.३८ | - | १३१.९२ | १३१.९२ |
| **वजाः उत्पन्न POC शुल्क InSTS द्वारे** | ५.९९ | - | - | - |
| **पारेषण व्यवसायातून एकत्रित कमाईची आवश्यकता** | ४४६०.७९ | - | ४७५०.१७ | ४८८४.७८ |
| अधिक – वहन खर्च (धारण खर्च) फरक विभाजित करण्यासाठी | २९.१८ | - | - | २९.१८ |
| अधिक– मागील उत्पन्नातील फरक/ (अतिरिक्त) नियंत्रीत कालावधीत विभाजित करण्यासाठी | ८७.२९ | - | - | ८७.२९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रोत्साहन आणि प्रभावसह पारेषण दरामधून निव्वळ एकत्रित महसूल आवश्यक्यता | ४५७७.२५ | - | ४७५०.१७ | ५००१.२५ |
| पारेषण दरामधून उत्पन्न आणि अतिरिक्त पारेषण नियमन शुल्क | ४५७७.२५ | - | ४६८९.४५ | ४६८९.४५ |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) | - | - | - | ३११.७९ |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) मागील वर्षापर्यंत | - | - | - | १८९५.१८ |
| एकत्रित उत्पन्न फरक / (अतिरिक्त) चालू वर्षांपर्यंत | - | - | - | २२०६.९८ |

१.२.७ वित्तीय वर्ष २०२२-२३ करिता एकत्रित महसूल आवश्यकता यांचे हंगामी समायोजन

महापारेषण ही याचिका एप्रिल ते ऑगस्ट २०२२ च्या वास्तविक आर्थिक आकडेवारीच्या आधारे आणि वित्तीय वर्ष २०२२-२३ मधील सप्टेंबर २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीसाठी अंदाजे आर्थिक आकडेवारीवर आधारीत वित्तीय वर्ष २०२२-२३ साठी एकत्रित महसूल आवश्यकता हंगामी समायोजनासाठी दाखल करत आहे. सारांश वरून असे दिसून येते की, या याचिकेत दाखल केलेला एकत्रित महसूल आवश्यकता मा. आयोगाने प्रकरण क्र. ३०२ वर्ष २०१९ मधील आदेशान्वये मंजूर केलेल्यापेक्षा जास्त आहे, मुख्यतः प्रमाणित आधारावर O&M खर्चाच्या दाव्याच्या कारणास्तव आणि भाग भांडवलावरील परतावा दावा ३५% वर मिळकत कर दराने केला जात आहे (३०२ /२०१९ मध्ये मा. आयोगाने गृहीत धरलेल्या MAT दराविरूध) महावितरणने रु. ४०२ कोटी च्या मर्यादेपर्यंत काही प्रमाणात मुक्त प्रवेश शुल्क परत केले असल्याने मोठ्या प्रमाणात दरबाहय उत्पन्नात वाढ झाली आहे.

तक्ता ७. वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या हंगामी समायोजनाचा सारांश.

रुपये कोटींमध्ये

| तपशील | बहुवर्षीय वीजदर आदेश | प्रमाणिक | वित्तीय वर्ष २०२२-२३ (हंगामी) | हंगामी समायोजन आवश्यकता |
|---|---|---|---|---|
| दुरूस्ती देखभाल व खर्च | १७३७.१८ | २३३०.३८ | २३३०.३८ | ५९३.२० |
| घसारा खर्च | ११८२.८३ | - | १२०६.१६ | २३.३३ |
| दिर्घ मुदत कर्जावरील व्याज | ६५८.७४ | - | ६५३.०१ | -५.७३ |
| इतर व्याज आणि आर्थिक खर्च | १.०० | - | १.०० | - |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ९९.५९ | १०१.९१ | १०१.९१ | २.३२ |
| आयकर | - | - | - | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **आकस्मिक राखीव योगदान** | ७२.८४ | - | ७३.९७ | १.१३ |
| एकूण महसूल खर्च | ३७५२.१९ | - | ४३६६.४२ | ६१४.२३ |
| अधिक – भाग भांडवलावरील परतावा | ११८९.६४ | - | १५४७.७५ | ३५८.११ |
| एकत्रित महसूल आवशक्यता | ४९४१.८२ | - | ५९१४.१८ | ९७२.३६ |
| **वजा : दरबाहय उत्पन्न** | २१८.९७ | - | ७०२.२९ | ४८३.३२ |
| **वजाः व्हीलिंग शुल्क व इतर उत्पन्न** | १२७.४५ | - | १२७.४५ | - |
| **वजाः उत्पन्न POC शुल्क InSTS द्वारे** | ५.९९ | - | ५.९९ | - |
| **पारेषण व्यवसायातून एकत्रित कमाईची आवश्यकता** | ४५८९.४२ | - | ५०७८.४५ | ४८९.०३ |
| अधिक – वहन खर्च (धारण खर्च) फरक विभाजित करण्यासाठी | २०.८४ | - | २०.८४ | |
| अधिक– मागील उत्पन्नातील फरक/ (अतिरिक्त) नियंत्रीत कालावधीत विभाजित करण्यासाठी | ८७.२९ | - | ८७.२९ | - |
| प्रोत्साहन आणि प्रभावसह पारेषण दरामधून निव्वळ एकत्रित महसूल आवशक्यता | ४६९७.५४ | - | ५१८६.५८ | - |
| पारेषण दरामधून उत्पन्न आणि अतिरिक्त पारेषण नियमन शुल्क | ४६९७.५४ | - | ४६९७.५४ | - |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) | - | - | ४८९.०४ | - |
| उत्पन्न फरक / (अतिरिक्त) मागील वर्षापर्यंत | - | - | २२०६.९८ | - |
| एकत्रित उत्पन्न फरक / (अतिरिक्त) चालू वर्षापर्यंत | - | - | २६९६.०१ | - |

१.२.८ वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी एकूण महसूल आवश्यकते चे सुधारित अंदाज

महापारेषण ही याचिका मागील सर्व महसुलातील तफावत, नामंजूर भांडवलीकरणाचा प्रभाव आणि त्यावरील वहन खर्च विचारात घेऊन एकूण महसूल आवश्यकताचे वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ सुधारित अंदाज प्रमाण तत्वावर दाखल करत आहे.

तक्ता ८. वित्तीय वर्ष २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी एकूण महसूल आवश्यकतेचे सुधारित अंदाज

रुपये कोटींमध्ये

| तपशील | वित्तीय वर्ष २०२३-२४ | | वित्तीय वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | बहुवर्षीय वीजदर आदेश | अंदाजित | बहुवर्षीय वीजदर आदेश | अंदाजित |
| दुरूस्ती देखभाल व खर्च | १८२४.०४ | २४६८.५२ | १९१५.२४ | २६०३.३६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| घसारा खर्च | १२२४.३१ | १२८४.१६ | १२५४.५४ | १३५९.६९ |
| दिर्घ मुदत कर्जावरील व्याज | ६०८.८७ | ६५७.४८ | ५३३.२३ | ६५०.९२ |
| इतर व्याज आणि आर्थिक खर्च | १.०० | १.०० | १.०० | १.०० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १०२.७० | १५२.२४ | १०४.७० | १५५.२६ |
| आयकर | - | - | - | - |
| **आकस्मिक राखीव योगदान** | ७५.९१ | ७८.२८ | ७७.५३ | ८२.४३ |
| एकूण महसूल खर्च | ३८३६.८४ | ४६४१.६७ | ३८८६.२५ | ४८५२.६६ |
| अधिक – भाग भांडवलावरील परतावा | १२२८.१८ | १६३३.३९ | १२५५.४२ | १७१८.११ |
| एकत्रित महसूलाची आवशक्यता | ५०६५.०२ | ६२७५.०६ | ५१४१.६७ | ६५७०.७७ |
| वजा – दरबाहय उत्पन्न | २२३.३५ | ३४३.३७ | २२७.८२ | ३६०.५४ |
| **वजाः व्हीलिंग शुल्क उत्पन्न** | १३३.८२ | १३३.८२ | १४०.५१ | १४०.५१ |
| **वजाः उत्पन्न** POC **शुल्क** InSTS **द्वारे** | ५.९९ | ५.९९ | ५.९९ | ५.९९ |
| **पारेषण व्यवसायातून एकत्रित कमाईची आवश्यकता** | ४७०१.८७ | ५७९१.८८ | ४७६७.३५ | ६०६३.७३ |
| अधिक– मागील उत्पन्नातील फरक/ (अतिरिक्त) वरील वहन **(**धारण खर्च**)** | - | ३५१.७१ | - | ११७.२४ |
| अधिक – वहन खर्च (धारण खर्च) फरक विभाजित करण्यासाठी | १२.५० | १२.५० | ४.१७ | ४.१७ |
| अधिक– मागील उत्पन्नातील फरक/ (अतिरिक्त) नियंत्रीत कालावधीत विभाजित करण्यासाठी | ८७.२९ | ८७.२९ | ८७.२९ | ८७.२९ |
| वहन दराद्वारे निव्वळ एकत्रित महसूल आवशक्यता प्रोत्साहन आणि प्रभावसहित | ४८०१.६६ | ६२४३.३८ | ४८५८.८१ | ६२७२.४३ |
| महसूल अंतर / (अतिरिक्त) | - | ६२४३.३८ | - | ६२७२.४३ |
| महसूल अंतर / (अतिरिक्त) मागील वर्षापर्यंत | - | २४८१.१८ | - | २४८१.१८ |
| संचयी महसूल अंतर / (अतिरिक्त) या वर्षापर्यंत | - | ८७२४.५६ | - | ८७५३.६१ |